# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय:-** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या ३२ व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/कांदळवन समिती/ १८८ /२०२४-२५
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: १६ /०१/२०२५

**प्रति,**

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
४. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
५. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई/ठाणे/कल्याण-डोंबिवली/मिरा-भाईंदर/वसई-विरार/नवी मुंबई /पनवेल/ भिवंडी- निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
६. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
७. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
९. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
१०. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
११. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (SRA)
१२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
१३. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
१४. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
१५. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
१६. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१७. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
१८. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
१९. श्रीमती. हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्श्न ग्रुप.
२०. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
२१. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२२. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
२३. उप मीठ आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई (विशेष निमंत्रित)

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-१/कांदळवन समिती/१६२/सन २०२४-२५, दि.१७.१२.२०२४.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **३२ वी** बैठक **गुरुवार, दि.२६.१२.२०२४** रोजी **मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

( डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से )
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

## कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३२ वी बैठक
## दिनांक २६.१२.२०२४ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग तसेच समितीचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सह-अध्यक्ष, कांदळवन कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **मा. विभागीय आयुक्त यांचे दालनात, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई** येथे ३२ वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष, मा.सह-अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीशः अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजेश देशमुख, भा.प्र.से. | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री. एस. व्ही. रामाराव, भा.व.से. | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ४. | श्री. नितिन महाजन | अपर आयुक्त, महसूल | विभागीय आयुक्त, कोकण यांचे कार्यालय |
| ५. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| ६. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| ७. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग |
| ८. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| ९. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| १०. | श्री.अभय पिंपळकर | संचालक (व्ही.सी.द्वारे) | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ११. | श्री.प्रदीप रा.तावरे | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे प्रतिनिधी (सहा.अधीक्षक) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| १२. | श्रीमती कांचन ज्ञानोबा पवार | विभागीय वन अधिकारी | मुंबई कांदळवन संधारण घटक,दक्षिण कोकण |
| १३. | सौ.गिरिजा देसाई | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.व्दारे) | चिपळूण |
| १४. | श्री.सुधीर लक्ष्मण मांजरे | वनपरिक्षेत्र अधिकारी | नवी मुंबई |
| १५. | श्री.स्टॅलिन डी | संचालक (व्ही.सी.व्दारे) | वनशक्ती (NGO) |
| १६. | श्री.जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार | सिडको |
| १७. | श्री. दिपक धरवंदे | व.आरेखक | सिडको |
| १८. | SRO | SRO (व्ही.सी.व्दारे) | रत्नागिरी |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | श्री.अनिल वि. पंडित | प्रकल्प कार्यकारी | BOMBAY ENVIRONMENT ACTION GROUP |
| २०. | डॉ. रेश्मा पितले | शास्त्रज्ञ | BNHS, मुंबई |
| २१. | सौ.सरिता निलकंठ मुसके | सागरी सुरक्षा | सागरी शाखा, पालघर |
| २२. | श्री.उमेश पाटील | तहसिलदार, जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालय यांचे वतीने | ठाणे जिल्हा |
| २३. | श्री.राजेश पवार | कार्यकारी अभियंता | पर्यावरण विभाग |
| २४. | डॉ.कैलास गायकवाड | उप-आयुक्त, परि.२ | नवी मुंबई, महानगरपालिका |
| २५. | श्री. प्रशांत मर्दे | सहाय्यक पोलिस आयुक्त | पोलीस उपआयुक्तालय (अभियान), मुंबई |
| २६. | श्री.अरुण नामवेद पवार | पोलिस निरीक्षक | सी.बी.डी. पो. ठाणे |
| २७. | श्री. पुंडलिक मिराशे | सल्लागार (पर्या.) | MIDC, अंधेरी |
| २८. | श्री. वैभव शेलार | सहा.वास्तुशास्त्रज्ञ, प्रा.का. | MIDC, महापे. |
| २९. | श्री.भारत शिवाजी ठेंबरे | पोलीस उप निरीक्षक | संरक्षण शाखा, ठाणे, शहर |
| ३०. | श्री.अजिंक्य पाटील | कक्ष अधिकारी, पर्या | नमुंमुपा |
| ३१. | श्री. विजय कातुर्डे | कार्या.सहाय्यक, पर्या व वने | सिडको |
| ३२. | श्री.दिपक धरवंदे | व.आरेखक | सिडको |
| ३३. | श्री.अजय वानखेडे | उप नियोजनकार, (पर्या व वने) | सिडको |
| ३४. | श्री. प्रदिप तावरे | सहाय्यक अधिक्षक | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय |
| ३५. | श्री.गोविंद शिवाजी मगर | सहाय्यक अभियंता ( SRA, BMC) | SRA, BMC |
| ३६. | श्री. अभिजित भुजबळ | पोलीस निरीक्षक | सुरक्षा शाखा, रायगड |
| ३७. | श्री. आयाज युसूफ पटेल | पोलीस निरीक्षक | कळंबोली, पो.ठाणे, पनवेल विभाग |
| ३८. | उपविभागीय अधिकारी | वसई, (व्ही.सी.द्वारे) | वसई |
| ३९. | पनवेल महानगरपालिका | DMC (व्ही.सी.द्वारे) | पनवेल महानगरपालिका |
| ४०. | PCC Head Office | PCC, Head Office यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | PCC, Head Office |
| ४१. | श्रीमती. राधिका फ़डके | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४२. | श्री. अनिकेत मनोरकर | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४३. | श्री.रोशन राठोड | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४४. | श्री.श्रीपाद कुलकर्णी | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४५. | सोनम देशमुख | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४६. | श्री.सत्यसेलवम | (व्ही.सी.द्वारे) | |

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्यामुळे वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | • समितीचे सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्ष, मा.सह-अध्यक्ष व सर्व उपस्थितांचे स्वागत केले. कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या ३२ व्या बैठक दि. २६.१२.२०२४ रोजीच्या सदर विषयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका ८७/२००६ अन्वये पारित केलेल्या कांदळवन क्षेत्राच्या हस्तांतरणांच्या आदेशांबाबत जिल्हानिहाय आढावा घेतला.<br>• त्यानंतर, मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार जिल्हानिहाय / शासकीय विभागनिहाय (महसूल तसेच इतर विभाग) संबंधित विभागाच्या अधिपत्याखाली खाली नमुद केलेले कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्यासाठी प्रलंबित असल्याचे सांगितले. |

| अ.क्र. | जिल्हा | शासकीय विभाग | क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | सिंधुदूर्ग | महसूल | ५८.१० | या संदर्भात व्हि.सी.व्दारे बैठकीत उपस्थितीत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील प्रतिनिधी यांनी विभागीय वन अधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडून काही अनुपालन (Compliance) अहवाल अप्राप्त असल्याचे सांगितले त्याबाबत, मा.सह अध्यक्ष यांनी जमिनी हस्तांतरण करण्याबाबतच्या Section 4 बाबत काही शंका असल्यास तसे सांगावे किंवा जमिनी त्वरीत हस्तांतरीत करावी कारण सदर सिंधुदूर्ग जिल्ह्यातील जमिनी हस्तांतरणाचा विषय हा मागील एक वर्षापासून सुरु असून त्याबाबत मा.उच्च न्यायालयात देखील प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले असल्याचे सांगितले तसेच याबाबत, मा.सह-अध्यक्ष यांनी उपवनसंरक्षक, सिंधुदूर्ग यांना संबंधित यंत्रणेकडून ताबा घेण्याबाबत सूचना दिल्या व त्याबाबतची ताबा पावती मिळाल्यानंतर Section 4 बाबत Notification पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. याबाबत, मा.अध्यक्ष यांनी संबंधित यंत्रणांनी वन विभागाशी समन्वय साधून जमिनी हस्तांतरणाचा विषय निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. |
| २. | पालघर | महसूल | १२७७.५८ | या संदर्भात उपविभागीय अधिकारी, वसई यांनी १२७७.५८ हेक्टर क्षेत्रापैकी ८११.०० हेक्टर क्षेत्रातील - २४१.०० हेक्टर क्षेत्राचा ताबा वन विभागास देण्यात आला असून आणखी १९.०० हेक्टरचा ताबा दोन दिवसात देणार असल्याचे सांगितले. तसेच, २०० हेक्टर क्षेत्र हे रेताड व पडीक जमिन आहे व १००.०० हेक्टर क्षेत्र यापूर्वी वन विभागास हस्तांतरित करण्यात आले आहे. साधारण १०१ हेक्टर क्षेत्रातील सर्व्हे नंबर मध्ये काही अडचणी असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यासमवेत आठ दिवसात प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार असल्याचे सांगितले उर्वरित क्षेत्रात काही ठिकाणी रस्त्याची कामे व काही रेल्वे विभागाची कामे सुरु असून १०० हेक्टर क्षेत्र हे पाणाखाली आहे. त्याचप्रमाणे, आणखी ११९ हेक्टर क्षेत्राचा ताबा देऊ शकतो असे सांगितले व १२७७.५८ हेक्टर मधील ८११ हेक्टर वगळून उर्वरित क्षेत्राची मोजणी पूर्ण करुन १५ दिवसात देऊ शकतो असे सांगितले. याबाबत, मा.अध्यक्ष यांनी उपविभागीय अधिकारी, वसई यांना वन विभागाशी समन्वय साधून १२७७.५८ हेक्टर क्षेत्र तात्काळ वन विभागास हस्तांतरण करण्याच्या सूचना दिल्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | रायगड | JNPA | ७०.३३ | या संदर्भात उपविभागीय अधिकारी, कर्जत यांनी JNPA कडे क्षेत्र हस्तांतरणबाबत सद्यस्थितीची विचारणा करण्यात आली असल्याचे सांगितले तसेच, त्याबाबत JNPA यांनी पत्राने कळविले आहे की, केंद्र सरकारकडे सदर क्षेत्राचा ताबा देण्यासाठी पत्र व्यवहार केलेला आहे. अद्याप, त्यांना मान्यता मिळाली नसल्यामुळे पुढील कार्यवाही केलेली नाही असे सांगितले उक्त प्रकरणाबाबत, SDO, कर्जत यांनी या कालावधीस २ वर्षे झाल्यामुळे पुन्हा एकदा पत्रव्यवहार करुन सद्यस्थितीबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले. त्यानुसार, मा.सह-अध्यक्ष यांनी JNPA ने केंद्र सरकारकडे पाठविलेल्या पत्रामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा उल्लेख केला आहे किंवा कसे याबाबत, उपविभागीय अधिकारी, कर्जत यांना तपासण्याबाबत सूचना दिल्या. |
| ४. | ठाणे | महसूल | २.६९ | या संदर्भात बैठकीत उपस्थितीत तहसिलदार, ठाणे यांनी २.६९ हेक्टर क्षेत्रातील अतिक्रमण निष्कासित करुन पुर्नस्थापन (Restoration) प्रस्ताव समितीस १५ दिवसात सादर करण्यात येईल असे सांगितले. |
| ५. | मुंबई, शहर | महसूल | २३.६५ | या संदर्भात सदर क्षेत्र केंद्र शासनाच्या अंतर्गत सॉल्ट पॅन विभागाच्या ताब्यात असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले याबाबत, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार सदर क्षेत्र हस्तांतरण करण्याचे अनिवार्य असून याबाबत सॉल्ट पॅन विभागाशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्याबाबतचा सद्यस्थितीचा अहवाल सॉल्ट पॅन विभागाकडून घेऊन समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले. |
| | | **एकूण** | १४४३.३५ | |

| | | |
|---|---|---|
| २. | कोकण विभागातील सर्व (७) सागर तटीय जिल्ह्यातील समितीकडे Offiline पध्दतीने प्राप्त झालेल्या तक्रारींचा निपटारा करणेबाबत चर्चा. | दि.१५.०३.२०२४ पर्यंत कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीसमोर आलेल्या ऑफलाईन तक्रारीबद्दल झालेल्या चर्चेनुसार एकूण ९६ तक्रारी प्राप्त आहेत. याबाबत, सदस्य सचिव यांनी ठाणे,जिल्ह्यातील ४० तक्रारींवर अहवाल प्राप्त झाले असून त्यातील २२ तक्रारी निकाली काढण्याची विनंती करण्यात आली असल्याचे सांगितले व उर्वरित प्राप्त १८ तक्रारींचे अहवाल स्वयंस्पष्ट नसल्याने प्रलंबित ठेवण्यात आले असल्याचे देखील सांगितले. याबाबत, मा.सह-अध्यक्ष यांनी महसूल व इतर यंत्रणांनी तक्रारीबाबतचा अहवाल स्वयंस्पष्ट असावा त्याबाबत, मा.विभागीय आयुक्त, कोकण यांचेमार्फत अहवालाचे प्रारुप वेळोवेळी पाठविण्यात आले असल्याचे बैठकीस उपस्थित सर्व सदस्यांच्या निर्देशनास आणून दिले. तसेच, मा.सह-अध्यक्ष यांनी ९६ तक्रारी या जुन्या असून एका महिन्याच्या आत निकाली काढण्याचे निर्देश देखील दिले.<br>याबाबत, अशासकीय सदस्य, स्टॅलिन डी, यांनी संबंधित यंत्रणांना मा.विभागीय आयुक्त, कोकण यांनी तक्रारींचा Restroation प्रस्ताव समितीस सादर करणेबाबत सूचना कराव्यात अशी विनंती केली त्यानुसार, मा.अध्यक्ष यांनी सर्व जिल्ह्यातील ऑफलाईन तक्रारींबाबत **जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण** समित्यांनी त्यांचे अधिनस्त असणा-या सर्व तक्रारीचे अवलोकन करुन तक्रारनिहाय दखल घेवून कांदळवन पुर्नस्थापन (Restoration) करणेसाठी लागणारा कालावधी आणि त्यासंबंधी येणा-या खर्चाचे (Associated Cost) संबंधित महानगरपालिका अथवा इतर स्वायत्ता संस्थाकडून करण्याचे |

नियोजन करुन सविस्तर कृती आराखडा (Action Taken Report) तयार करावा व यावर सातत्याने सनियंत्रण ठेवून नंतर विभागीय स्तरावरील समितीसमोर पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सूचना दिल्या.

| District | Total No. of Complaints pending as on the date of 32nd Meeting | Total No. Reports received after 32nd Meeting | No. of complaints disposed |
|---|---|---|---|
| Thane | 40 | 40 | 22 |
| Mumbai Suburban | 30 | 30 | 11 |
| Palghar | 13 | 4 | 4 |
| Raigad | 13 | 10 | 4 |
| **Total** | **96** | **84** | **41** |

तसेच, समितीस प्राप्त अहवालची छाननी करुन निकाली काढण्यात येणा-या जिल्ह्यानिहाय तक्रारींवर Restoration प्रस्ताव समितीस पाठविण्याच्या अधिन राहून सदर तक्रारी निकाली काढण्याबाबत सूचना दिल्या.

३ Mangorve Suraksha App वरील प्राप्त तक्रारींच्या स्थळपाहणीसाठी तारीख व स्थळपाहणी अहवाल विहित प्रारुपात ॲपवर अपलोड करणे व त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत चर्चा

दि.१६.०३.२०२४ पासून Mangrove Suraksha App सुर करणेत आले असून या ॲपवर तक्रारदार Online स्वरुपात तक्रार दाखल करतात व काही तक्रारी अजूनही offiline प्रकारामध्ये प्राप्त होतात त्यादेखील या ॲपवर कांदळवन कक्षा मार्फत Upload केल्या जात असून दि.२०.१२.२०२४ अखेर Mangrove Suraksha App वर प्राप्त तक्रारीबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे.

| District | Total Complaint | Open Complaint | Close Complaint | Pending for giving date to site inspection | Pending for uploading site inspection report | Pending for uploading action taken report |
|---|---|---|---|---|---|---|
| Mumbai City | 15 | 7 | 8 | 0 | 6 | 7 |
| Mumbai suburban | 120 | 112 | 8 | 2 | 110 | 112 |
| Palghar | 32 | 24 | 8 | 11 | 21 | 24 |
| Raigad | 59 | 24 | 35 | 6 | 20 | 24 |
| Ratnagiri | 4 | 0 | 4 | 0 | 0 | 0 |
| Sindhudurg | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 0 |
| Thane | 113 | 85 | 28 | 6 | 68 | 85 |
| **Total** | **349** | **252** | **97** | **25** | **225** | **252** |

मा. सह-अध्यक्ष यांनी सर्व सदस्यांना Mangrove Suraksha App कशाप्रकारे हाताळावयाचे आहे. याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच, जतन करण्यात येणारे विहित प्रपत्रातील स्थळ पाहणी अहवालात Restortation चा रकाना (Column) नव्याने समाविष्ट करुन सर्व सदस्यांना पाठविण्यात येईल असे सूचित केले त्याचप्रमाणे, मा.सह-अध्यक्ष यांनी सर्व सदस्यांना विहित स्थळ पाहणी अहवाल हा स्वयंस्पष्ट असण्याबाबत पुनश्च: सूचना दिल्या व उपविभागीय अधिकाऱ्यांना **Pending for giving date to site inspection** व **Pending for uploading site inspection report** समितीच्या पुढील बैठकीपूर्वी या संबंधीची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या.

| | | |
|---|---|---|
| ४. | मा. अध्यक्ष व मा.सह-अध्यक्ष यांनी मागील बैठकीत दिलेल्या सूचना. | याबाबत, मा.उच्च न्यायालयाने **कांदळवन क्षेत्राच्या हस्तांतरणांचे निर्देश पूर्णत्वाकडे नेण्यासाठी, कांदळवन कक्ष,** मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार **जिल्हानिहाय / शासकीय विभागनिहाय (महसूल तसेच इतर विभाग)** संबंधित विभागाच्या अधिपत्याखाली **कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत** करण्यासाठी लवकर कारवाई करणेबाबत मा.सह-अध्यक्ष यांनी बैठकीत सूचना दिल्या तसेच, मा.अध्यक्षांनी कांदळवनाचे पुर्नःस्थापन करण्यासाठी सर्व जिल्हाधिका-यांनी सर्व बाबी समाविष्ट करुन (Action Plan) एकत्रितरित्या समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्याबाबत पुनश्चः सूचना दिल्या. |
| ५. | पोलिस यंत्रणेमार्फत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत सद्यस्थिती व त्या गुन्हयामध्ये शिक्षा झालेल्या प्रकरणांबाबत आढावा. | मा. सह-अध्यक्ष यांनी याबाबत, पोलिस यंत्रणेमार्फत दाखल करण्यात येणा-या गुन्ह्यांमध्ये तपास होणे आवश्यक असून त्याबाबत अंतिम कार्यवाही होणे अपेक्षित आहे असे सांगितले. याबाबत, मा.अध्यक्ष यांनी ठाणे, पालघर, रत्नागिरी, नवी मुंबई जिल्ह्यात प्रलंबित गुन्ह्यांच्या सद्यस्थितीचा अहवाल समितीस विहित प्रपत्रात अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याबाबत पुनश्चः सूचना दिल्या. |
| ६. | ऐनवेळीचा विषय | • चेंबूर (छेडानगर) मधील न.भू.क्र. ६६१ मध्ये १.२६ हेक्टर कांदळवन क्षेत्र विभागीय वन अधिकारी, उत्तर कोकण, कांदळवन कक्ष यांना आगाऊ ताबा (Advance Possession) घेण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाने दि.२३.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले असल्याचे बैठकीत उपस्थित अतिरिक्त आयुक्त, (महसूल), कोकण विभाग यांनी सांगितले. त्याबाबत, मा.सह-अध्यक्ष यांनी सदर क्षेत्रावर तंटबंदी बांधणे आवश्यक असल्याने वरील पत्रान्वये देण्यात आलेले आगाऊ कांदळवन क्षेत्र ताबा हा तात्पुरत्या स्वरुपाचा असल्याचे निर्देशनास आणून दिले. याबाबत, अतिरिक्त आयुक्त (महसूल) यांनी वरील जमिन हस्तांतरणाचा प्रस्ताव शासनास सादर केला असल्यामुळे त्याचा आगाऊ ताबा वन विभागास दिले असल्याचे सांगितले.<br>• मा.सह-अध्यक्ष यांनी व्हि.सी.व्दारे उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सेक्टर ८ - चारकोप व जनकल्याणनगर येथील महसूल विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्र जमिन वन विभागास त्वरीत हस्तांतरण करण्याच्या सूचना संबंधित तहसिलदार यांना आपल्या स्तरावरुन देण्याचे निर्देश दिले. ज्यामुळे, वन विभागास त्याठिकाणी कांदळवनाच्या संरक्षणासाठी तंटबंदी बांधणे शक्य होणार असल्याचे सांगितले.<br>• तसेच, श्री.स्टॅलिन डी यांनी, कार्टर रोड येथील कांदळवन क्षेत्राबाबत विचारणा केली तसेच, कार्टर रोड येथे खुप चांगले प्रमाणात कांदळवन क्षेत्र असून तिथे मोठ्या प्रमाणात डेब्रिज भराव सुरु असल्याचे सांगितले. त्याबाबत, महसूल विभागाला विचारणा केली असता सदर क्षेत्र १५ वर्षापूर्वी वन विभागास देण्यात आले असल्याचे सांगितले व वन विभागाकडे चौकशी केली असता वन विभागाकडे अशा कोणतेही Land Handover Documents नसल्याचे सांगण्यात आले आहे असे बैठकीत निर्देशनास आणून दिले. याबाबत, मा.सह-अध्यक्ष यांनी बैठकीत सर्व सदस्यांच्या पुनश्चः निर्देशनास आणून दिले की, कोणत्याही विभागाच्या अख्यतारेतील |

| | | |
|---|---|---|
| | | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरित करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असल्याचे सांगितले. त्यानुसार, संबंधित कार्टर रोड येथे संबंधित तहसिलदार व वन विभाग यांचेमार्फत पंचनामा करुन कांदळवन क्षेत्र असल्यास सदर कांदळवन जमिन वन विभागाच्या ताब्यात घेण्यात येईल असे सांगितले. |

(एस. व्ही.रामाराव, भा.व.से.)
सह अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष

(डॉ. राजेश देशमुख, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग